महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४३ वे | दिनांक : १८/०५/२०२६ | वार : सोमवार

## राज्यात मुख्यमंत्रिपदासाठी आज सर्व्हे केला तर एकनाथ शिंदेंना जास्त पसंती



**पंढरपूर :** महाराष्ट्रात आज जरी कोणी मुख्यमंत्रिपदासाठी सर्व्हे केला, तरी जनतेच्या मनातून केवळ एकनाथ शिंदे यांचेच नाव समोर येईल. त्यांच्या सर्वसामान्यांशी असलेल्या बांधिलकीमुळेच मलाच काय, तर अवघ्या महाराष्ट्राला ते पुन्हा मुख्यमंत्री व्हावे असे वाटते. यासाठी देवाला साकडे घालण्याची गरज नाही, आम्ही आता थेट जनतेलाच साकडे घालू, असे शिवसेना आमदार बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्यावर झालेल्या पोलिस कारवाईचा बच्चू कडू यांनी तीव्र निषेध केला. लोकशाहीत आंदोलन करणे म्हणजे गुन्हा नाही. राजू शेट्टी आणि महादेव जानकर यांच्यावर कारवाई करणाऱ्या संबंधित पोलिस अधिकाऱ्यांचे तातडीने निलंबन करण्यात यावे, अशी मागणी कडू यांनी केली आहे. तसेच, आम्ही या लढ्यात शेट्टी आणि जानकर यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला घरचा आहेर दिला.

बच्चू कडू म्हणाले की, मी आता कोणत्याही जातीपातीच्या आंदोलनात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकरी आणि विकलांग (दिव्यांग) हे सर्वच जातींमध्ये असतात. त्यामुळे कोणत्याही एका विशिष्ट जातीच्या चौकटीत न अडकता, व्यापक विचार ठेवून मी यापुढे केवळ शेतकरी आणि दिव्यांगांच्या हक्कासाठीच लढणार आहे.

काही दिवसांपूर्वीच बच्चू कडू यांनी राज्य सरकारला अल्टिमेटम दिला की, राज्यातील दिव्यांग आणि नेत्रहीन बांधवांना मिळणारे 'संजय गांधी निराधार योजने'चे मानधन गेल्या काही महिन्यांपासून रखडलेले आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधताना ते म्हणाले की, सरकारने दिव्यांगांच्या आर्थिक मदतीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा; अन्यथा रखडलेल्या अनुदानासाठी दिव्यांगांच्या वतीने मंत्रालयावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

## महिन्याभरात पेट्रोल १२० ते १३० रुपयांवर जाणार : जयंत पाटील यांनी वर्तवले भाकित



**सांगली :** देशात इंधन दरवाढीचा भडका उडाला असून पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत थेट 3 रुपयांची वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर अत्यंत गंभीर भाष्य केले आहे. "आज 96 रुपयांना मिळणारा डॉलर महिन्याभरात 100 रुपयांवर जाईल, तर पेट्रोलचे दर 120 ते 130 रुपयांवर पोहोचतील," असा इशारा त्यांनी दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशातील जनतेला इंधन बचतीचे आवाहन केले होते. या आवाहनाच्या दोन दिवसांतच पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढून, प्रत्येकी 3 रुपयांनी महाग झाले आहेत. या महागाईवरून विरोधकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांनी पेट्रोल-डिझेलची आणखी भाववाढ होणार असल्याची भविष्यवाणी केली. शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांच्या अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्यात बोलताना जयंत पाटील यांनी केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार तोफ डागली.

देशातील सद्यस्थितीवर चिंता व्यक्त करताना जयंत पाटील म्हणाले, "कोरोनाच्या काळात सरकारने लॉकडाऊन लावला होता. पण आता देशापुढील आर्थिक संकट पाहता, परिस्थिती अशी निर्माण होईल की देशात आपोआपच लॉकडाऊन लागेल." जेव्हा देशावर आर्थिक संकट येते, तेव्हा त्याचा पहिला फटका शेतकरी आणि शेतमजुरांना बसतो, त्यामुळे या संकटातून मार्ग कसा काढायचा यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधानांनी देशवासीयांना पेट्रोल-डिझेल आणि सोन्याची खरेदी कमी करण्याचे आवाहन केल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच दर वाढल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. जयंत पाटील यांनी सांगितले की, "इंधन टंचाईच्या भीतीने लोक पेट्रोल पंपांवर रांगा लावत आहेत. वाशिममधील एका पेट्रोल पंपावर तर नागरिक चक्क ड्रम घेऊन डिझेल-पेट्रोलसाठी एकमेकांशी भिडले असून तिथे मारामारी सुरू असल्याचा व्हिडिओ मी स्वतः पाहिला आहे."

जयंत पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्र सरकारमधील विसंगतीवर बोट ठेवले. "पंधरा दिवसांपूर्वी देशाच्या गृहमंत्र्यांनी सांगितले होते की आपल्याकडे 6 महिने पुरेल इतका इंधन साठा आहे. त्याला महिनाही झाला नाही, तोच पंतप्रधानांनी नागरिकांना खर्च कमी करण्याचे आवाहन केले. 2013 मध्ये जेव्हा आर्थिक परिस्थिती बिकट झाली होती, तेव्हा तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अशीच भूमिका घेतली होती. "त्यावेळी आत्ताच्या मुख्यमंत्र्यांनी देशाची आर्थिक व्यवस्था डबघाईला आल्याचे ट्विट केले होते. मात्र, आज तेच मुख्यमंत्री 'पंतप्रधानांच्या आवाहनाची थट्टा करू नका' असे ट्विट करत आहेत," असा टोला जयंत पाटलांनी लगावला.

जयंत पाटील म्हणाले की, "आर्थिक काटकसरीचा भाग म्हणून पंतप्रधानांनी आपला ताफा कमी करत दोन गाड्यांवर आणला आहे, तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री दुचाकीवरून फिरायला लागलेत. आता याचेच अनुकरण राज्यातील इतर मंत्रीही करतील आणि संपूर्ण मंत्रिमंडळ दुचाकीवर येईल, अशी अपेक्षा करूया!"

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १८ मे २०२६


## लाच प्रकरणात ग्रामसेवकाला जामीन मंजूर:




**हिंगोली :** सेनगाव तालुक्यातील सवना येथे घरकुलाच्या प्रस्तावासाठी अडीच हजार रुपयांची लाच घेणाऱ्या ग्रामसेवकास हिंगोलीच्या जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश एस. एन. माडे गाडेकर यांनी शनिवारी ता. 16 जामीन मंजूर केला आहे.

सेनगाव तालुक्यातील सवना येथील एका लाभार्थ्याला मंजूर झालेल्या घरकुलाच्या पाहणी अहवालावर स्वाक्षरी करून प्रस्ताव पुढे पाठविण्यासाठी ग्रामसेवक रामप्रसाद खिल्लारी याने लाभार्थ्याकडे 5 हजाराची मागणी केली होती.

मात्र त्यानंतर अडीच हजारात तडजोड झाली होती. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार प्राप्त झाल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपाधीक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत यांच्या पथकाने त्यास गोरेगाव येथील गोरेगाव चौफुली वर बुधवारी ता. 13 लाच घेतांना रंगेहात पकडले होते.

या प्रकरणी गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर त्यास न्यायालयाने एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. पोलिस कोठडी संपल्यानंतर त्यास न्यायालयात हजर केल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली होती. तर दुसरीकडे जिल्हा परिषदेने त्याच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

दरम्यान, ग्रामसेवक खिल्लारी याच्या वतीने ॲड. मनिष साकळे यांनी जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. एन. माने गाडेकर यांच्या न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने त्याचा जामीन मंजूर केला आहे. याप्रकरणात ग्रामसेवक खिल्लारी याच्या वतीने ॲड. मनिष साकळे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. सिध्दार्थ थोरात, ॲड. अविनाश बांगर, ॲड. हर्ष बनसोडे, ॲड. चेतन अग्रवाल यांनी सहकार्य केले.


**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## ज्ञानेश्वर विद्यालयात २००३ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा संपन्न; जुन्या आठवणींना मिळाला उजाळा




**छत्रपती संभाजीनगर :** येथील बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालय येथे रविवार, दिनांक १७ मे २०२६ रोजी सन २००३ मधील इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याचे (गेट-टुगेदर) उत्साहात आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाच्या 'कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ' सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या वर्गमित्रांनी एकमेकांची गळाभेट घेत शाळेच्या सुवर्णकाळातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.आजी-माजी शिक्षकांची मोठी उपस्थितीया कौटुंबिक स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ.संध्या मोरे या होत्या. तसेच मंचावर व कार्यक्रमास प्रमुख अतिथी माजी शिक्षक मोहम्मद सलीम, नारायण लवांडे,रंजना भिसे,पर्यवेक्षक संभाजी तांगडे,यशवंत खराद,जोशी सर, वसंत शिंदे, अनिल शिंदे, नितीन भारती, एम. टी. गायकवाड, नाझेरा पठाण आणि आरती या आजी-माजी शिक्षक वृंदांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी आपल्या सर्व लाडक्या गुरुजनांचे गुलाब रोपटे, पेन, शाल,पुष्पगुच्छ देऊन मनापासून स्वागत केले. माजी विद्यार्थ्यांकडून २५ हजारांची देणगी; डिजिटल बोर्ड घेण्याची मुख्याध्यापिकांची ग्वाहीशाळेप्रती असलेली आपली कृतज्ञता व्यक्त करत २००३ च्या बॅचच्या सर्व माजी विद्यार्थिनींनी एकत्रितपणे २५,००० रुपये रोख रक्कम विद्यालयास भेट म्हणून दिली. या देणगीचा स्वीकार करताना मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच, या निधीचा उपयोग शाळा नक्कीच विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी 'डिजिटल बोर्ड' घेण्यास प्राधान्य देईल, अशी ग्वाही त्यांनी सर्व उपस्थितांसमोर दिली. माजी विद्यार्थ्यांच्या या दातृत्वाचे सर्वांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत उत्साही वातावरणात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिभा सपकाळ यांनी करून मेळाव्याच्या आयोजनामागची भूमिका आणि सर्व वर्गमित्रांना एकत्र आणण्याचा उद्देश स्पष्ट केला.त्यानंतर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन संदीप ढंगारे यांनी आपल्या खुमासदार शैलीत केले.याप्रसंगी उपस्थित आजी-माजी शिक्षक मंडळींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या भाषणानंतर सर्व माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील विविध प्रसंग,शिक्षकांकडून मिळालेली शिस्त आणि मित्रमैत्रिणींमधील धमाल या आठवणींना उजाळा दिला. या भावनिक सोहळ्यात, आपल्यातून निघून गेलेल्या ज्ञात-अज्ञात महानुभावांना आणि दिवंगत सहकाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.अध्यक्षीय भाषण, आभार आणि सांगताकार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ.संध्या मोरे यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले व सर्व विद्यार्थ्यांना पुढील यशस्वी आयुष्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वादपर शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या प्रेरणादायी अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची मुख्य सांगता झाली.

यानंतर डॉ. मंगेश डोंगरे यांनी सर्व आजी-माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि उपस्थित मित्रमैत्रिणींचे आभार मानले. अत्यंत शिस्तबद्ध आणि भावुक वातावरणात झालेल्या या कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला. त्यानंतर सामूहिक भोजनाने या सोहळ्याची सांगता झाली.

## भाजप सरकारला जनतेच्या खिशाची नाही, तर उद्योगपतींच्या तिजोरीची जास्त काळजी



**नागपूर :** जनतेला पेट्रोल डिझेल कमी वापरा म्हणून उपदेश करणाऱ्या सरकारने, तेल कंपन्यांना निर्यात कमी करा, असं सांगायची हिंमत का दाखवली नाही? असा सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केला आहे. इंधन दरवाढीच्या मुद्द्यावरून केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर वडेट्टीवार यांनी कडाडून टीका केली आहे.

विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, १ लाख ३२ हजार कोटींचं कच्चं तेल आयात करायचं, त्यातील ५२ हजार ८७६ कोटींचं तेल परदेशात विकायचं आणि मग देशातील नागरिकांच्या खिशातून महाग पेट्रोल डिझेलच्या नावाखाली पैसे वसूल करायचे. म्हणजे नफा कंपन्यांचा आणि लूट सामान्य माणसाची. भारतीय जनता पार्टी सरकारला जनतेच्या खिशाची नाही तर उद्योगपतींच्या तिजोरीची जास्त काळजी आहे, हे पुन्हा स्पष्ट झालं, असे म्हणत भाजपवर टीका केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, स्वतःच्या अपयशावर पडदा टाकण्यासाठी देशभक्तीच्या घोषणा दिल्या जातात आणि दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाला अक्षरशः पिळलं जातं.जनतेला गाडी कमी चालवा सांगणाऱ्यांनी आधी कंपन्यांचा लोभ कमी करावा. नाहीतर हे सरकार जनतेसाठी नसून काही मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी चालतंय, हा संशय आता विश्वासात बदलायला वेळ लागणार नाही, असा हल्लाबोल वडेट्टीवार यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी म्हटले होते की, पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर आजच कमी केला पाहिजे. शेजारील देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती अनेक पटींनी वाढल्या आहेत. या जागतिक संकटाचा भारतावर विशेष परिणाम झाला आहे, कारण आपल्याकडे मोठ्या तेल विहिरी नाहीत. आज आपल्याला 'वर्क फ्रॉम होम' सारख्या उपायांची गरज आहे. ज्या शहरांमध्ये मेट्रो आहे, तेथील लोकांनी तिचा वापर केला पाहिजे.वाहनांचा अनावश्यक वापर कमी करा, मेट्रोने प्रवास करा आणि कारपूलिंग करा. या मार्गांवर शक्य तितक्या जास्त लोकांना घेऊन प्रवास करा.





## मराठी शिक्षक महासंघाच्या वतीने कु.जयश्री पाटीलचा गुणगौरव सोहळा संपन्न



**(शिरूर कासार) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी घेतलेल्या इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत,शारदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर,वरुड (बु.)ता.भोकरदन जि.जालना येथील कु.जयश्री देविदास पाटील या विद्यार्थिनीने मराठी विषयात १०० पैकी ९९ गुण घेऊन महाराष्ट्र राज्यातून प्रथम क्रमांक मिळविला.एक प्रकारे तिने छत्रपती संभाजीनगर विभागाच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला आहे.कु.जयश्री पाटीलचे इ.५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण ग्रामीण भागातील वरूड (बु.)या छोटेशा खेडेगावात झाले असून तिने मराठी विषयात ९९ गुण प्राप्त करून संपूर्ण महाराष्ट्रात लौकिक प्राप्त केला आहे.ही बाब मराठवाड्यासाठी भूषणावह आहे.मराठी भाषेचा झेंडा अटकेपार नेणाऱ्या कु.जयश्री देविदास पाटील हिच्या यशाचा गुणगौरव करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी शिक्षक महासंघाने वरुड (बु.)येथे प्रत्यक्ष घरी जाऊन कु.जयश्री पाटील,तिची आई प्रा.सौ.मनीषा पाटील,वडील डॉ.देविदास भगवानराव पाटील यांचा शाल,बुके व सन्मानचिन्ह देऊन यथोचित गुणगौरव केला.या गुणगौरव सोहळ्या प्रसंगी मराठी शिक्षक महासंघाचे अध्यक्ष माननीय प्रा.सुनील डिसले (बारामती),कार्याध्यक्ष डॉ.मनीषा रिठे(वर्धा),राज्य समन्वयक तथा मुख्य नियमक डॉ.राजेंद्र सोनवणे (जालना)व नागपूर जिल्हाध्यक्ष प्रा.सुरेश नखाते,वर्धा जिल्हाध्यक्ष प्रा.गिरीश काळे,बीड जिल्हाध्यक्ष डॉ.आत्माराम झिंजुर्डे इत्यादींनी मनोगतातून कौतुक व अभिनंदन केले आणि पुढील शिक्षणासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी कु.जयश्रीचे सर्व कुटुंबीय,शाळेतील सर्व शिक्षक,पदाधिकारी,प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते

## ८५०० उमेदवारांनी दिली SRPF ची लेखी परीक्षा:४ परीक्षा केंद्रांवर शांततेत परीक्षा, पण बॅगा ठेवण्याची सोय नसल्याने परीक्षार्थींची धावपळ



**छत्रपती संभाजीनगर :** राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा रविवारी सकाळी शहरातील चार केंद्रांवर शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सकाळी 11 ते 12.30 या वेळेत घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी तब्बल ८ हजार ५०० उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यामुळे सकाळपासूनच परीक्षा केंद्र परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली. कडक तपासणी करूनच केंद्रात प्रवेश देण्यात आला. पण परीक्षा केंद्रांवर उमेदवारांनी आणलेले साहित्य ठेवण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे त्यांना आपल्या बॅगा परीक्षा केंद्राबाहेर उघड्यावर ठेवाव्या लागल्या काही बॅगा झाडांवर अडकवलेल्याही दिसून आल्या.एमआयटी कॉलेज, श्रेयस कॉलेज, चाटे स्कूल आणि एंजल कीड स्कूल या चार केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस विभाग आणि प्रशासनाच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले होते. केंद्र परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उमेदवारांना प्रवेश देण्यापूर्वी कडक तपासणी करण्यात आली. परीक्षेसाठी उमेदवार सकाळी लवकरच केंद्रावर दाखल झाले. केंद्रांबाहेर पालक आणि नातेवाईकांचीही मोठी उपस्थिती दिसून आली.

परीक्षा प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली. परीक्षेच्या कामकाजासाठी एकूण एक हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पोलीस विभागाच्या नियमानुसार संपूर्ण परीक्षाप्रक्रिया सुरळीत पार पडली.

परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. पण उमेदवारांनी आणलेले साहित्य ठेवण्याची कोणतीही तजवीज नव्हती. अनेक उमेदवार बाहेर गावांवरून आले होते. त्यामुळे त्यांच्यापुढे आपल्यासोबतच्या बॅगा कुठे ठेवायच्या हा प्रश्न होता. अखेर त्यांनी परीक्षा केंद्राबाहेर असणाऱ्या झाडांखाली व झाडांवरच अडकवून आपल्या बॅगा ठेवणे पसंत केले. याचे काही फोटो व व्हिडिओ समोर आले आहेत. त्यात परीक्षा केंद्रावर ठिकठिकाणी बॅगा पडलेल्या दिसून येत आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १८ मे २०२६

# कल्याण रेल्वे स्टेशनवर अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**मुंबई :** अहिल्यानगरहून खोपोली येथे आपल्या मामाच्या घरी जाणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर एका नराधमाने कल्याण रेल्वे स्थानकावर अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. नसरापूर अत्याचार प्रकरणामुळे अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असताना ही घटना घडली आहे हे विशेष.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, पीडित मुलगी अहिल्यानगर येथून खोपोली येथे आपल्या मामाच्या गावी जात होती. ती कल्याण रेल्वे स्थानकात लोकल ट्रेनची वाट पाहत उभी होती. त्यावेळी आरोपी सौरभ सोनावणे याने तिच्या हातातील मोबाईल हिसकावून घेतला. मुलीने त्याच्याकडे आपला मोबाईल परत मागितला असता त्याने 'मोबाईल हवा असेल तर माझ्यासोबत पोलिस स्टेशनमध्ये चल' असे सांगितले. त्यानंतर आरोपी मुलीला घेऊन कल्याण रेल्वे यार्डात गेला. तिथे त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यावेळी पीडितेने स्वतःची कशीबशी सुटका करून घेऊन रेल्वे पोलिस ठाणे गाठले.

त्यानंतर पोलिसांना आपल्यावर गुदरलेला प्रसंग सांगितला. तिची आपबीती ऐकताच पोलिसांनी प्रकरणाचे गांभिर्य ओळखत तातडीने तपासाला सुरूवात केली. त्यांनी कल्याण रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज खंगाळून आरोपी सौरभ सोनावणे याच्या मुसक्या आवळल्या. सध्या आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. पोलिसांच्या मते, पीडित मुलीला कल्याणहून खोपोली येथे आपल्या मामाच्या घरी जायचे होते. त्यासाठी ती कल्याण रेल्वे स्थानकात लोकल ट्रेनची वाट पाहत होती. त्यावेळी आरोपीने तिचा मोबाईल हिसकावून घेत तिला आपल्यासोबत येण्यास भाग पाडले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केला.

उल्लेखनीय बाब म्हणजे कल्याण रेल्वे स्थानकावर २४ तास प्रवाशांची वर्दळ असते. एवढ्या वर्दळीच्या रेल्वे स्थानकावर हा प्रकार घडल्यामुळे मोठे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेषतः आरोपी मुलीला त्रास देत होता तेव्हाही तिथे काही प्रवाशी असल्याचेही दिसून येत आहे. पण त्यांची या मुलीला कोणतीही मदत झाली नसल्याचेही दिसून येत आहे. या एकूणच प्रकारामुळे रेल्वे स्थानकावरील सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दुसरीकडे, पुणे पोलिसांनी नसरापूर बलात्कार प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात तब्बल ११०० पानी आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले आहे. या आरोपपत्रात ५० हून अधिक साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही फुटेज, डीएनए टेस्ट, वैद्यकीय व न्यायवैद्यक अहवालाचा तपशील जोडण्यात आला आहे. महाराष्ट्र दिनी नसरापूर येते एका साडेतीन वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली होती.

या घटनेचे राज्यभर संतप्त पडसाद उमटले होते. पोलिसांनी या प्रकरणाचा अहोरात्र तपास करून गुन्हा घडल्याच्या १५ दिवसांतच शनिवारी रात्री आरोपीविरोधात आरोपपत्र दाखल केले.

# ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



"राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, येत्या 30 जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल," अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली. पुणे ॲग्री हॅकेथॉनच्या पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी कर्जमाफीसह पार्थ पवार यांची भेट, कथित ऊर्जा संकट, ड्रग्जविरोधी मोहीम आणि मराठा समाजाच्या कल्याणकारी योजना अशा विविध राजकीय व सामाजिक मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली.

शेतकरी कर्जमाफीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "या संदर्भात कॅबिनेट उपसमितीची महत्त्वाची बैठक पार पडली आहे. आम्ही प्रशासनाकडून काही अतिरिक्त आणि सविस्तर माहिती मागवली आहे. ती माहिती हाती येताच प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत 30 जूनपूर्वी राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ दिला जाईल."

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी मुख्यमंत्र्यांची घेतलेली भेट सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. यावर बोलताना फडणवीस यांनी या भेटीतील हवा काढून घेतली. ते म्हणाले, "पार्थ पवार काल मला भेटायला आले होते. आमच्यात काही प्रशासकीय आणि काही राजकीय विषयांवर चर्चा झाली. आम्ही शेवटी महायुतीचे मित्रपक्ष आहोत. त्यामुळे त्यांनी माझी भेट घेणे ही काही मोठी किंवा आश्चर्यकारक बातमी असू शकत नाही."

गेल्या काही दिवसांतील वीज कपातीच्या चर्चांवर स्पष्टीकरण देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "राज्यात अजिबात ऊर्जा संकट नाही. आपल्याकडे गरजेपेक्षा जास्त वीज उपलब्ध आहे. एखाद्या भागात तांत्रिक कारणांमुळे किंवा 'ग्रीड फेल्युअर' (Grid Failure) झाल्यामुळे काही तासांसाठी पुरवठा खंडित होतो, याचा अर्थ राज्यात वीज टंचाई आहे असा होत नाही. महाराष्ट्र विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे."

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी राज्यातील ड्रग्जच्या विळख्यावरून केलेल्या टीकेचा मुख्यमंत्र्यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला. "पंजाब किंवा इतर राज्यांची ड्रग्जबाबतची स्थिती काय आहे आणि महाराष्ट्राची काय आहे, हे आकडेवारीवरून स्पष्ट होते. अशा प्रकारे राजकीय स्वार्थासाठी महाराष्ट्राला बदनाम करणे राजू शेट्टींना शोभत नाही," असे फडणवीस म्हणालेत.
"पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली देशात अंमली पदार्थांविरोधात मोठी लढाई सुरू आहे. महाराष्ट्र यात आघाडीवर असून, तात्पुरती आव्हाने असली तरी ही लढाई आपण नक्कीच जिंकू," असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सरकारच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या योजनांचा पाढा वाचला. ते म्हणाले, "सारथी (SARTHI) संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजातील असंख्य तरुण आज IAS, IPS आणि MPSC परीक्षांमध्ये यश मिळवत आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातून विक्रमी संख्येने तरुण उद्योजक बनले आहेत. स्कॉलरशिप आणि वसतिगृहात जागा न मिळाल्यास दिला जाणारा 'निर्वाह भत्ता' नियमित सुरू आहे. कोणतीही योजना बंद किंवा स्लो झालेली नाही."

## विचारांच्या क्रांतीची मशाल

विझू देणार नाही कधी,
माझ्या विचारांची मशाल.
जीवन अर्पण करणार,
देश सेवेसाठी मी खुशाल. १

विचारांच्या मशालीने,
आता उजेड मी दावतो.
अन्याय करणाऱ्याच्या,
बुडाखाली आग मी लावतो. २

विचारांच्या मशालीने,
सर्वांना सावध करतो.
अन्यायाविरुद्ध लढतांना,
शब्दाशब्दात बारूद भरतो. ३

शब्दांच्या बारूदाने आता,
अन्यायाचा बुरूज उडवितो.
अन्याय करणाऱ्यास कायम
शब्दाने अद्दल मी घडवितो. ४

विचारांच्या क्रांतीची मशाल,
आता सर्वांनीच तेवत ठेवा.
विचारांच्या क्रांतीच्या मशालीने
घडणार आहे शब्दातुन सेवा. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## आमची श्रावू

आमची श्रावू
खेळते च्याऊ म्याऊ
खेळताना म्हणते
नवे गीत गाऊ

आमची श्रावू
अंगणी लागते धावू
पावसात भिजत म्हणते
चिंब चिंब न्हाऊ

आमची श्रावू
टी.व्ही.लागते पाहू
पाहताना म्हणते
कार्टून आपण पाहू

आमची श्रावू
चॉकलेट लागते खाऊ
खाताना म्हणते
चिऊताईला देऊ

आमची श्रावू
दूध लागते पिऊ
पितांना म्हणते
ये ग मनीमॅऊ



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

